नि.फौ.ख.क्र७४/२०१६
सरकार वि. विकास
नि.क.२३

**सरकार पक्षा तर्फे साक्षीदार क.३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो/करते की,

माझे नाव : मयुर माणिकराव गिल्लूरकर
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : शेती
राहणार : बुधवारीपेठ, उमरेड, तह. उमरेड, जि. नागपूर

**सर तपास सरकारी अभियोक्ता श्री. मरसकोल्हे यांचे मार्फत :-**

मी आरोपीला ओळखतो. मी जख्मी उमेश कारमोरे याला ओळखतो व त्यांची पत्नीला चेह-याने ओळखतो. मला घटनेबाबत काहीही माहित नाही. पोलीसांनी माझे बयान घेतले नव्हते. मला फक्त माझे नाव विचारले होते.

**सरकारी वकीलांनी साक्षदार सहकार्य करीत नाही असे मांडले, उलट तपासातील प्रश्न विचारण्याकरिता परवानगी देण्यात येत आहे :-**

आरोपी, फिर्यादी, जख्मी हे माझे मोहल्ल्यात राहतात. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी रात्री ९:१५ ते ९:३० चे दरम्यान मला झगडयाचा आवाज आला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी घरी होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी चौकाकडे पाहण्याकरिता गेलो असता त्याठिकाणी जख्मी उमेशने त्याच्या काखेमध्ये आरोपीचे हात पकडून ठेवले होते हे म्हणणे खरे नाही की, विकास कारमोरे याच्या हातामध्ये भाल्यासारखा धारदार शस्त्र होते. हे म्हणणे खरे नाही की, उमेश कारमोरे याचे शर्ट रक्ताने भरले होते. हे म्हणणे खरे नाही की, उमेशाच्या पत्नीने तेथे येवून झगडा सोडविण्याचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा कुणाचेही ऐकत नव्हता व धमकी देत होता की,

कोणीही माझेविरूध्द बयान दिले तर मारून टाकीन. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने उमेश याला भाल्यासारख्या दिसणा-या अवजाराने मारून जख्मी केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना बयान दिले होते व मला वाचून दाखविले होते. माझे बयानातील अधोरेखांकित भाग अ दाखविला तो बरोबर नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला धमकी दिली होती त्यामुळे त्याला वाचविण्याकरिता आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपीतर्फे वकील श्री.खाटीक यांनी नाकारला :</u>-**

**फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले समक्ष

न्या.दं.प्र.श्रे.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि : १७.०२.२०२१